नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक १४९ । वर्ष ४८ वे । मंगळवार, २० जून २०२३ । पाने १२

सार्वमत

महत्त्वाचे

## प्रा.विजय पाटोळे यांना पुणे विद्यापीठाची पीएचडी



श्रीरामपूर (प्रतिनिधी)- येथील रयत शिक्षण संस्थेच्या स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनचे शिक्षक-प्रशिक्षक प्रा.विजय संतू पाटोळे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी.ही पदवी बहाल केली. त्यांनी डेव्हलपमेंट अँण्ड डीटरमीन दी इफेक्टिवनस ऑफ फनेटिक्स प्रोग्राम फॉर प्री-सर्व्हिस टिचर्स या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले. त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र व विस्तार सेवा विभाग प्रमुख प्रो. डॉ.मेघा उपलाने यांचे मार्गदर्शन लाभले.

Date 3/3/2023

सार्वमत

# शिक्षकांनी काळानुसार बदलले पाहिजे-जगधने

## बीएड महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयावर कार्यशाळा

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**- शिक्षक समृद्ध असेल तरच विद्यार्थी समृद्ध होईल. शिक्षकांनी बदलत्या काळानुसार स्वतः बदलले पाहिजे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग काउन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांनी केले.

येथील स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नुकतीच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर आधारित राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न झाली. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून मीनाताई जगधने बोलत होत्या. कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे विभागीय अधिकारी तुकाराम कन्हेरकर यांनी केले.

प्रथम दिवशी प्रथम सत्रात साधन व्यक्ती मुख्याध्यापक नागेश मोने म्हणाले, आनंद-दुःख हे संसर्गजन्य असतात. मुले अनुकरणशील असल्याने शिक्षकांचे वर्तन आदर्श असावे. शिक्षकाने शिकणे अवघड आहे, असे बिंबवले तर त्याचा विपरीत परिणाम होताना दिसतो. आताचा विद्यार्थी समृद्ध होण्यासाठी, शिक्षकांनी देखील समृद्ध व्हायला हवे. द्वितीय सत्रात शिक्षक प्रशिक्षक डॉ. वर्षा कुलकर्णी म्हणाल्या, शिक्षकाने अध्यापनात ज्ञानरचनावादाचा वापर करावा. साचेबंदपणा सोडून नवीन ज्ञानाशी ओळख करावी. अनेक युक्त्या, उपक्रम, खेळ विद्यार्थ्यांसाठी स्वतः तयार करावे, विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करून शिक्षकाने आपले संवाद कौशल्य ठेवावे. अध्यापनाचा व व्यावहारिक जीवनाचा संबंध शिक्षकाने जोडला पाहिजे.

दुसऱ्या दिवसाच्या प्रथम सत्रात संदीप वाकचौरे म्हणाले, शिक्षक विद्यार्थ्यांच्या हृदयात असतो तर राज्यकर्ते मस्तकात असतात. पाठ्यक्रम नाही, तर अभ्यासक्रम पूर्ण करण्याची जबाबदारी शिक्षकाची आहे, असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सांगते. या धोरणात सर्वात जास्त महत्त्व अध्ययन अनुभवास दिलेले आहे. चिकित्सक अभ्यासक्रम, विचार प्रक्रिया तपासणारी मूल्यमापन पद्धती, समस्या निराकरणावर भर देणारी अध्यापनपद्धती, विविध प्रकल्प व उपक्रम हेच मुळात नवीन शैक्षणिक धोरणाचा मूळ पाया आहे.

दुसऱ्या दिवसाच्या दुसऱ्या सत्रात ॲक्टिव्ह टीचर्स फोरमचे संयोजक भाऊसाहेब चासकर म्हणाले, शिक्षकाजवळ स्वतःचे ग्रंथालय हवे. आयुष्य समृद्ध करण्यासाठी पुस्तके आणि भेटलेली माणसे महत्त्वाची आहे. अध्यापकांनी संदर्भानुसार आशय निवडला पाहिजे. शिक्षकांनी सतत वाचन करावे, आपला आशय समृद्ध करावा व्यावसायिक विकास करावा.

समारोपप्रसंगी जनरल बॉडी सदस्य प्रकाश निकम पाटील यांनी, शिक्षकांनी बदलत्या परिस्थितीनुसार बदलून नवीन आव्हानांना सामोरे जावे तसेच विद्यार्थ्यांचे भविष्य घडवावे, असे मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे, प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी प्रास्ताविक, पाहुण्यांचे स्वागत व परिचय करून दिला. प्रा. डॉ. भागवत शिंदे व प्रा. विजय पाटोळे यांनी कार्यशाळेचे नियोजन व व्यवस्थापन केले. सूत्रसंचालन डॉ. अनिल करवर व डॉ. अमितकुमार गागरे यांनी केले. तसेच प्रा. डॉ. रामदास नान्नर व प्रा. चंद्रकांत भोये यांनी आभार मानले. याप्रसंगी ग्रंथपाल प्रा. नारायण मेंगाळ, किरण भाकरे, बाबासाहेब काळे, प्रभाकर जगधने, पठाण तसेच नगर जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्था व अन्य संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक उपस्थित होते.

बाबा
E-mail : jaibaba_shriram@rediffmail.com
कार्य. संपादक : मनोजकुमार आगे


साईप्रसाद
काचणी सत्व
आता आपल्या
स्मार्ट बाळासाठी
स्मार्ट पॅकिंग मध्ये...
Belapur - 413 715, A'nagar (M.S.)
For Customer Care No. 9970646264

/15144 NO.BH/RNP/SRP/034/Jay Baba/2021-2023 वर्ष १६ वे पाने ४ किंमत रु. ३/-

# फळाची अपेक्षा न ठेवता कर्म करीत राहणे हेच समाधान होय-प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे

शिरसगाव (प्रतिनिधी)- भगवत गीतेत सांगितल्याप्रमाणे फळाची अपेक्षा न करता, कर्म करीत राहिले पाहिजे. चांगल्या कामात प्रामाणिकपणे समर्पित राहण्यात आनंद आहे. अशा सत्कर्मांची दखल आपली जवळची माणसे घेतात हे सर्वात मोठे समाधान आहे, असे उद्गार प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी काढले.

श्रीरामपूर येथील रयत शिक्षण संस्थेच्या स्वामी सहजानंद भारती शिक्षण शास्त्र महाविद्यालयात प्राचार्य डॉ. शंकरराव गागरे मित्रमंडळ व वाचन संस्कृती प्रतिष्ठानतर्फे गुणीजनांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य शंकरराव अनारसे होते. प्राचार्य दत्तात्रय ... यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी गुणीजनांचा गौरव परिचय करून देत सत्कारसूचना मांडली. प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अभ्यास मंडळ व प्रा. डॉ. रामदास नाथ्रर यांची शैक्षणिक मानसशास्त्र अभ्यास मंडळावर दोघांची सदस्यपदी बिनविरोध निवड झाली. प्रा. डॉ. अमित गागरे यांची बालभारती अभ्यासक्रम मंडळावर निवड झाली. प्रा. डॉ. अनिल करवर यांना पीएच. डी. पदवी मिळाली. प्रा. डॉ. भागवत शिंदे यांनी संपादन केलेल्या महाविद्यालयीन 'सहजानंद' वार्षिकास सलग तीन वर्षांपासून पुरस्कार मिळाला. प्रा. चंद्रकांत भोये यांना एम. फिल. पदवी मिळाली. प्रा. विजयराव पाटोळे यांची महाविद्यालयाच्या आयक्यूएसी समितीच्या कार्याध्यक्षपदी निवड झाली. किरण भाकरे यांची वरिष्ठ लिपिक पदावर निवड झाली. त्या सत्कारप्रसंग या गुणीजन मान्यवरांना शाल, पुष्प, पुस्तके देऊन सन्मानित करण्यात आले. माजी प्राचार्य टी. ई. शेळके, प्रा. शिवाजीराव बारगळ यांनी अशी निवड होणे ही प्रेरणादायी बाब असून सत्कारातून सत्कार्यांना अधिक गती मिळते असे सांगितले. प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी सांगितले की रयत संकुलामुळे रयत शिक्षण संस्थेच्या जनरल कौन्सिल सदस्य आणि रयत संकुलाच्या अध्यक्ष मीनाताई जगधने यांच्या शुभहस्ते सहायक आमच्या निवडीनंतर सहकाऱ्यांचा सत्कार झाला व समाधान वाटले.



ज्ञानतपस्वी व्यक्तिमत्वांनी स्वतः पुढाकार घेऊन असा आशीर्वादरूपी केलेला सत्कार हा रयतप्रेमाचा आणि विचारांचा शिदोरी आहे, ती अधिक गोड आणि जीवनपोषक असल्याचे प्राचार्य डॉ. पोंधे यांनी सांगून सचिन तेंडुलकर यांचा प्रवासप्रसंग सांगितला.

अध्यक्षीय भाषणात माजी प्राचार्य शंकरराव अनारसे यांनी ज्ञानप्राप्तीबद्दल आणि सत्कारार्थी यांचे कष्टप्रद जीवन अनुभव सांगितले. विद्यार्थ्यांनी त्यांचे जीवन वाचून, समजून घ्यावे असे आवाहन केले. सूत्रसंचालन वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

। अंक ३५७ । वर्ष ४७ वे । बुधवार, १८ जानेवारी २०२३ । पाने १२

Page No. 4.

## पुणे विद्यापीठ अभ्यास मंडळावर प्राचार्य पोंधे व प्रो. नान्नर यांची निवड

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– येथील रयत शिक्षण संस्थेच्या स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन





(बीएड) या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र या विषयाच्या अभ्यास मंडळावर तसेच प्रो. डॉ. रामदास नान्नर यांची शैक्षणिक मानसशास्त्र या विषयाच्या अभ्यास मंडळावर बिनविरोध निवड झाली आहे.

प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे व प्रो. डॉ. रामदास नान्नर हे मागील २२ वर्षांपासून रयत शिक्षण संस्थेच्या सेवेत आहेत. प्राचार्य पोंधे यांची सलग तिसऱ्यांदा तर प्रो. नान्नर यांची दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली हे विशेष आहे, त्यांच्या निवडीबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग काउन्सिल सदस्या मीनाताई जगधने, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य प्रकाश निकम पाटील, ॲड. विजयराव बनकर पाटील, बापूसाहेब पटारे, डॉ. राजीव शिंदे, प्रभारी प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर, डॉ. प्रवीण बडधे, माजी विद्यार्थी संघटनेचे सर्व सदस्य, आजी माजी विद्यार्थी, प्राध्यापक, सेवक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

दै. सार्वमत. जानेवारी २०२३

# ‘रासेयो’तून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाला प्रेरणा : जगधने

श्रीरामपूर : समाजाच्या जडण-घडणीत तरुणाचा खूप मोठा वाटा असतो. तरुणांना घडविण्यामध्ये पुणे विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर विविध उपक्रम राबविले जातात. त्यातील राष्ट्रीय सेवा योजना हा उपक्रम आहे. राष्ट्रीय सेवा आणि त्याग यावर ही योजना उभी आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला ही योजना प्रेरणा देते, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांनी केले.

श्रीरामपूर येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व रयत शिक्षण संस्थेचे रा. ब नारायणराव बोरावके कॉलेज आणि स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्यूकेशन यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष-श्रमसंस्कार शिबिर निमगाव खैरी (ता. श्रीरामपूर) येथील कार्यक्रमप्रसंगी त्या बोलत होत्या. याप्रसंगी श्रीरामपूर उपप्रादेशिक परिवहन विभागाचे मोटार वाहन निरीक्षक धीरज भांबरे प्रमुख उपस्थित होते.

शिबिराचे उद्घाटन सरपंच उज्वलाताई शेजुळ यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपसरपंच भामाबाई धुळगंड, शिवाजी शेजुळ, प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर, डॉ.रवींद्र जगधने आदी उपस्थित होते.

भांबरे म्हणाले, कोणत्याही माणसाला जीवनात मेहनत केल्याशिवाय काहीच मिळत नाही आणि आज तर डिजिटल युगाचा जमाना आहे. स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धांमध्ये टिकण्यासाठी अभ्यास व कष्ट या गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत. म्हणून तरुणांनी खचून न जाता येणाऱ्या संकटाशी सामना केला पाहिजे. यासाठी त्यांनी आपला आत्मविश्वास सतत जागृत ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविक व परिचय प्रभारी प्राचार्य



निमगाव खैरी : येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिरात मार्गदर्शन करताना ‘रयत’च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने. (छाया : सुनिल पांढरे)

डॉ. प्रवीण बडधे यांनी करून दिला. शिबिरप्रसंगी काकासाहेब शेजुळ, आदिनाथ झुरळे, नितीन भागडे, नानासाहेब तुपे, बाघुजी पटारे, डॉ. रमेश धापटे, वासुदेव गायके, अरुण गमे, भागचंद उंदरे, भाऊसाहेब शेजुळ, जयश्री भागडे, सुभाषराव गायकवाड, प्रा. विश्वनाथ उंदरे, अर्जुन वडोगे, पांडुरंग सोनवणे, नारायण झुराळे, साईनाथ बनकर, सोपानराव शेजुळ, शोभाताई झुराळे आदी उपस्थित होते.

शिबिराचे नियोजन रा.से. योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. बाबासाहेब तोंडे, प्रा.डॉ. भागवत शिंदे, प्रा. जलाल पटेल व सहकारी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. भागवत शिंदे यांनी तर प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी आभार मानले. यावेळी ग्रामस्थ, राष्ट्रीय स्वयंसेवक विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मीनाताई जगधने : ध्यासवेडे कृतिशील व्यक्तिमत्व

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या, रयत संकुल श्रीरामपूरच्या चेअरमन मीनाताई जगधने यांचा २२ सप्टेंबर हा वाढदिवस यानिमित्त त्यांच्या बहुआयामी व्यक्तीमत्वाचा टिपलेला हा वेगळेपणा.......

महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्यांचे अमूल्य असे योगदान आहे त्या उभ्या महाराष्ट्राला सुपरिचित असलेल्या बारामतीच्या पुरोगामी व सुसंस्कृत पवार घराण्यात मीनाताईंचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण काटयाची वाडी बारामती येथे तर महाविद्यालयीन शिक्षण सातारा आणि पुणे येथे झाले. •वडीलांचा स्वभाव कडक शिस्तीचा तस्याच त्यांच्या आई कणखर स्वभावाच्या, अभ्यासामध्ये पहिला क्रमांक यावाच असं नाही, मात्र प्रत्येक क्षेत्राचे विषयाचे ज्ञान तुम्हाला असले पाहिजे अशी त्यांच्या आई वडीलांची शिकवण. कर्मवीर अण्णासोबत बारामतीला त्यांचे आई, वडील देणगी गोळा करण्यासाठी फिरायचे. त्यामुळे कर्मवीर अण्णांचा तसेच आचार्य अत्रे, नाना पाटील, शाहीर अमर शेख यांचाही प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्वावर पडलेला दिसून येतो. सर्वाधिक त्यांच्या आईच्या व्यक्तिमत्वाची छाप त्यांच्यावर उमटलेली. केवळ चुल आणि मुल एवढ्यापुरते मर्यादित न राहता मोठ्या धाडसाने त्या प्रत्येक क्षेत्रात कार्यरत असत. समाजातील प्रत्येक घटकांसोबत आईची असलेली बांधिलकी, राजकीय, सामाजिक क्षेत्रांचा असलेला दांडगा अभ्यास, धाडसी वृत्ती व सहजवावर या गुणांचे बाळकडू ताईंना मिळाले. महाविद्यालयीन स्तरावर अनेक क्रिडा स्पर्धेत त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले. आयुष्यात प्रत्येक क्षणी कार्यरत राहिले पाहिजे या आईच्या शिकवणीनुसार व सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेने त्यांनी श्रीरामपूर येथील रयत संकुलात सन १९९१-१९९२ ला बालवाडीची स्थापना केली. शिक्षणाला संस्कार, कृतिशिलतेची जोड देऊन त्याची सांगड प्रत्यक्ष जगण्याशी असावी या विचाराने या संस्कार केंद्राला त्यांनी नवी दिशा दिली. त्याकाळात त्यांनी कृतियुक्त, आनंददायी व दर्जेदार शिक्षणाची हमी पालकांना दिली व स्वतः बालवाडीसाठी घरोघरी फिरून मुले गोळा केली. शाळेसाठी स्वतः मुख्याध्यापक, शिपाई, क्लर्क, शिक्षण या भूमिका त्यांनी उठविल्या.

सतत नाविन्याचा शोध घेण्याची चातकवृत्ती त्यांच्या ठायी असल्याने त्यांनी राज्यभर फिरून शिक्षण क्षेत्रातील नवनवीन प्रयोग गोळा केले व शाळेमध्ये राबवले. जीवन कौशल्याशी निगडीत व दैनंदिन जीवनाशी जोडणारा या अनोख्या उपक्रमाने शिकण्याची प्रक्रिया अधिक आनंददायी व प्रभावी बनवली. परिणामस्वरूप शाळेची एकुण प्रगती झपाट्याने झाली. शाळेच्या विनाअनुदानितच्या त्या काळात आर्थिक स्त्रोत उभे करणे मोठे आव्हान होते. परंतु रयत संकुल, पालक वर्ग व समाज घटकांना सोबत घेवुन काम करण्याची भूमिका, हाती घेतलेले काम तडीस नेण्याची चिकाटी यामुळे हे



शिवधनुष्य त्यांनी लिलया पेलले. गुणवत्तापूर्वक शिक्षणाबरोबर मुलांसाठी त्यांनी दर्जेदार भौतिक सुविधा उभ्या केल्या.

काळाच्या पुढे जाऊन विचार करण्याची सवय असल्याने त्यांनी कित्येक वर्ष अगोदर विद्यालयात संगणक शिक्षण, एल. सी. डी. प्रोजेक्टर, इंटरनेटयुक्त डिजीटल बोर्ड, स्पोकन इंग्लिश, आकाशदर्शन, इ. उपक्रम राबविले. विषयांची स्वतंत्र दालने तयार करून मुलांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदविण्याचे मार्ग उपलब्ध करून दिले. शिक्षणातील बदल स्वीकारून तो अंगिकारण्याची त्यांची मानसिकता वाखवण्याजोगीच! म्हणून स्मार्ट फोन, टॅब इ. तंत्रज्ञानाचा वापरही शिकण्याच्या प्रक्रियेत त्यांनी सुरूवातीलाच राबविला.

वाचनाची त्यांना प्रचंड आवड! म्हणूनच त्यांनी श्रीरामपूरमध्ये महिलांसाठी पुस्तकभिशीचा अनोखा उपक्रम सुरू केला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी श्रीरामपूर येथील रयत संकुलात वाचनकट्टे उभारले. वाचन प्रेमीसाठी ते पर्वणीच ठरले! बालवाडी पासूनच्या मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी चालू वर्षी त्यांनी अतिशय आकर्षक, अनोखे, मुलांसाठी चित्ताकर्षक असे नाविन्यपूर्व ग्रंथालय उभारले. एखाद्या शाळेत असे नाविन्यपूर्ण ग्रंथालय कचितच असेल. यामुळे मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली. या ग्रंथालयाला भेट देण्यासाठी शिक्षणप्रेमींची सातत्याने गर्दी होत आहे. बदलत्या काळानुसार स्पर्धा परिक्षांचे महत्व ध्यानात घेवुन त्यांनी विद्यालयात स्पर्धा परिक्षांना पोषक असे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. शिक्षकांना या अनुषंगाने प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. परिणाम स्वरूप विद्यालयाचा विद्यार्थी पाचवी शिष्यवृत्ती परिक्षेत राज्यात पहिला आला. इतर असंख्य विद्यार्थी दरवर्षी शिष्यवृत्तीसह विविध स्पर्धा परिक्षेत राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत चमकतात. याचबरोबरच 'द ग्रेट मिट' सारखे कार्यक्रम वीणा गवाणकर, डॉ. राजीव तांबे यासारख्या नामवंतांच्या प्रत्यक्ष मुलांशी भेट घडवून आणतात. या सारखे नाविण्यापूर्ण प्रयोग गेली तीस वर्ष विद्यालयात त्या राबवत आहेत. परिणामस्वरूप विद्यालय अल्पावधीत नावारूपाला आले. विद्यालयाला रयत शिक्षण संस्थेचा सर्वोकृष्ट विद्यालयाचा कर्मवीर पारितोषिक पुरस्कार, राज्य स्तरीय संत गाडगेबाबा स्वच्छ व सुंदर शाळा, आय. एस. ओ. मानांकन इ. सन्मान मिळाले. ताईंच्या दुरदृष्टीने विद्यालय प्रयोगशील उपक्रमांची कर्मभूमीच बनली आहे! याशिवाय त्यांनी मुकबधीर, अंध, अस्थिव्यंग विशेष गरजा असणाऱ्या मुला मुलींचे विवाह जुळवून आणले. स्त्रीयांना अधिक वैचारिक दृष्टीने प्रगल्भ करण्यासाठी त्यांनी विविध प्रकारचे मार्गदर्शन केले.

मीनाताई जगधने रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल संस्था, उच्च शिक्षण कार्यकारणी सदस्या, महाराष्ट्र राज्य पालक शिक्षक संघ सदस्या व रयत शैक्षणिक संकुल श्रीरामपूरच्या चेअरमन आदि पदावर कार्यरत आहे. ताईंच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र शासनाने सावित्रीबाई फुले राज्य पुरस्कार प्रदान केला. याशिवाय शैलेजा पुरस्कार, माई गुजराथी पुरस्कार, डॉ. मेबल आरोळे स्मृती पुरस्कार, रमाई पुरस्कार, लोकमत राज्यस्तरीय सखी पुरस्कार, सार्वमत कर्मयोगिनी पुरस्कार आदि पुरस्कार त्यांना प्राप्त झाले. तसेच लायन्स क्लब, नगरपरिषद, महिला मंडळे यांनी मानपत्र देवुन त्यांना सन्मानीत केले. आज सुद्धा त्यांच्या या कामात कुठेच खंड पडला नाही. तीच धडपड, तीच लगबग, तोच उत्साह! शैक्षणिक क्षेत्रातील प्रत्येक बदल, प्रत्येक आव्हान यांना स्वीकारून सामोरं जावुन त्यातील विधायक ते अंगिकारत आहे. मुलांच्या निरागसतेवर असलेले अतीव प्रेम, मुलांच्या भावविश्वात समरस होवुन त्या निष्पाप अजाण बालकांविषयी असलेली प्रचंड आत्मीयता हीच त्यांची बलस्थाने असावीत की ज्यामुळे इतक्या अखंड उर्जेने आजही त्या अव्याहतपणे मुलांसाठी सदैव गुंतलेल्या आहेत ! ईश्वराची प्रतिरूप असलेली बालके घडविण्याचे ते काम कदाचित नियतीच त्यांच्या हातुन करत असावी. ताईंना वाढदिवसानिमित्त निरागस लक्ष लक्ष शुभेच्छा !!!

संजय त्रिभुवन
एस के सोमय्या प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्र श्रीरामपूर
७६२०३१८३२१

www.epunyanagari.com    Toll Free 18002081019

# पुण्य नगरी

नाशिक-अहमदनगर । शुक्रवार, १५ एप्रिल २०२२   वर्ष :२३ । अंक : १५ । पाने : ८+४=१२   । किंमत : ५.००

SMART- श्रीरामपूर - पुरवणी

Page No. 2.

## अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञान कौशल्य गरजेचे : डॉ. पाटील

**श्रीरामपूर :** आधुनिक काळामध्ये शिक्षकांनी अध्यापनासाठी तंत्रज्ञान वापराचे कौशल्य आत्मसात करावे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांनी केले. येथील स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी संस्थेचे जनरल बॉडी सदस्य प्रकाश निकम, बापूसाहेब पटारे, डॉ. रविंद्र जगधने, प्राचार्य सुहास निंबाळकर, माजी प्राचार्य शंकरराव अनारसे, डॉ. शंकरराव गागरे, डॉ. बाबुराव उपाध्ये, शंकरराव पुंड, आजी माजी विद्यार्थी व सेवक उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या. प्रारंभीप्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या ५० वर्षांच्या वाटचालीवर प्रकाष टाकणाऱ्या शिक्षणाच्या नव्या दिशा या विषेशांकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

ते पुढे म्हणाले, कर्मवीर भाऊराव पाटलांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केल्यानंतर प्रारंभीच्या काळात प्राथमिक व माध्यमिक शाळा स्थापन करण्याचा सपाटा लावला. या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकवणारा शिक्षक हा प्रशिक्षित असला पाहिजे असा कर्मवीरांचा आग्रह होता. त्यांच्या या विचारातूनच संस्थेची सात अध्यापक विद्यालये व दोन अध्यापक महाविद्यालये स्थापन झाली. या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकवणारा शिक्षक हा प्रशिक्षित असला पाहिजे असा कर्मवीरांचा आग्रह होता.




त्यांच्या या विचारातूनच संस्थेची सात अध्यापक विद्यालये व दोन अध्यापक महाविद्यालये स्थापन झाली. या सर्व शाखांमधून उत्तम शिक्षक घडविण्याचे काम प्रामाणिकपणे सुरु आहे. कोविड महामारीच्या काळात शिक्षकांच्या बदलत्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. शिक्षकांना या काळात ऑनलाईन अध्यापन करावे लागले. तंत्रज्ञान कौशल्ये असणारे शिक्षक या बदलांना सहज सामोरे गेल्याचे त्यांनी सांगितले.

15 फेब्रुवारी 2022 दै. पुढारी Page No. 7

# शिक्षणाने चांगला नागरिक घडवा : पवार

श्रीरामपूर : पुढारी वृत्तसेवा

विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी शिक्षण घेऊन किंवा स्पर्धा परीक्षा पास होऊन फक्त नोकरी म्हणून विचार करू नये, तर या शिक्षणाचा उपयोग उत्तम नागरिक घडविण्यासाठी केले पाहिजे, असे प्रतिपादन श्रीरामपूर उपविभागीय अधिकारी अनिल पवार यांनी केले.



श्रीरामपूर : खैरी निमगाव येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरात बोलताना उपविभागीय अधिकारी अनिल पवार.

खैरी निमगाव येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वत शैक्षणिक संकुलच्या चेअरमन मीनाताई जगधने होत्या.

मीनाताई जगधने यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा मुख्य उद्देश काय असतो, कशासाठी या विभागाची स्थापना केली आहे, यांचे सविस्तर विवेचन केले. या गावात सर्व स्वयंसेवकांनी गावाशी आपले नाते जोडले पाहिजे. हे गाव म्हणजे आपले कुटुंब आहे, असे समजून काम केले पाहिजे.

यावेळी कांताताई पठारे, शिवाजी शेजूळ, रामभाऊ तरस, काकासाहेब शेजूळ, भाऊसाहेब शेजूळ, आदिनाथ झुराळे, अशोक जेजूरकर, नितीन भागडे, सुभाष गायकवाड, नानासाहेब तुपे, विश्वनाथ उदे, बापूजी पटारे, अर्जुन बडोगे, रमेश धावटे, पांडुरंग सोनवणे, प्रतिष्ठित ग्रामस्थ आणि प्राचार्य डॉ. एस. निंबाळकर, उपप्राचार्य डॉ. एम. पी. चोळके व महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

आभार प्राचार्य डॉ. एम. एस. पोंधे यांनी मानले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाबा तोंडे, प्रा. डॉ. भागवत शिंदे व त्यांचे सर्व सहकारी यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले.

सकाळ | अहमदनगर गुरुवार, २ डिसेंबर २०२१

TODAY

SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800

## सहजानंद नियतकालिकास पारितोषिक

**श्रीरामपूर :** येथील स्वामी सहजानंद भारती महाविद्यालयाच्या सहजानंद वार्षिक नियतकालिकास सलग तिसऱ्या वर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नगर विभागात व्यावसायिक गटातून द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून दर वर्षी महाविद्यालयांकडून प्रकाशित केल्या जाणाऱ्या वार्षिक अंकांना विविध प्रकारची पारितोषिके दिली जातात. महाविद्यालयाच्या सहजानंद या वार्षिक अंकास २०१५-१६ व २०१६-१७ साठी नगर विभागातील व्यावसायिक गटातून तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व सहा हजार रुपयांचा धनादेश कुलगुरू नितीन करमाळकर, प्रभारी कुलगुरू एन. एस. उमराणी तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते युवा सन्मान सोहळ्यांत नुकताच प्रदान करण्यात आला. महाविद्यालयाच्या वार्षिक अंकासाठीच्या आणि नियतकालिक स्पर्धेतील यशाबद्दल अंकाचे संपादक प्रा. डॉ. भागवत शिंदे, संपादक मंडळ, लेखक व विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, प्राचार्य डॉ. एम. एस. पोंधे यांचे सहकार्य मिळाले.

दैनिक सार्वमत

दिनांक १.१२.२०२१

# बोरावकेंच्या पूर्ती नियतकालिकास पुणे विद्यापीठाचा पुरस्कार
## तर नगर विभागातून स्वामी सहजानंदची हॅटट्रिक



श्रीरामपूर (प्रतिनिधी)- रयत शिक्षण संस्थेच्या येथील स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या (बीएड) 'सहजानंद' या वार्षिक नियतकालिकास सलग तिसऱ्या वर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अहमदनगर विभागातील व्यावसायिक गटातून द्वितीय क्रमांकाचे तर रावबहादूर नारायणराव बोरावके कॉलेजच्या २०१८-१९ मध्ये प्रकाशित झालेल्या पूर्ती या नियतकालिकास अव्यावसायिक गटात नगर विभागाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे.


सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून दरवर्षी महाविद्यालयांकडून प्रकाशित केल्या जाणाऱ्या वार्षिक अंकांना विविध प्रकारची पारितोषिके दिली जातात. महाविद्यालयातील सहजानंद या वार्षिक अंकास २०१५-१६ व २०१६-१७ साठी अहमदनगर विभागातील व्यावसायिक गटातून तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले होते. तर २०१७-१८ या वर्षीच्या अंकासाठी याच विभागातून द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक म्हणून प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व रोख रुपये ६००० चा धनादेश कुलगुरू नितीन करमळकर, प्र-कुलगुरू एन. एस. उमराणी तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत युवा सन्मान सोहळ्यात प्रदान करण्यात आला.

बोरावके महाविद्यालयाच्या संपादक मंडळाच्यावतीने हिंदी विभाग प्रमुख डॉ. अनुप दळवी आणि मराठी विभागातील संतोष पवार यांनी तर बीएडच्या संपादक मंडळाचे प्रा.डॉ.भागवत शिंदे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. बीएड महाविद्यालयांच्या वार्षिक अंकासाठीच्या आणि नियतकालिक स्पर्धेतील हॅटट्रिकबद्दल या अंकाचे संपादक प्रा. डॉ. भागवत शिंदे, संपादक मंडळ, लेखक व विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग काउन्सिल सदस्या मीनाताई जगधने, प्राचार्य डॉ. एम. एस. पोंधे, प्राचार्य डॉ.एन. एस. गायकवाड, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, परिसरातील शाखा प्रमुख, शिक्षक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

# दैनिक पुण्यनगरी

पान नंबर २ आपले नगर पुरवणी  दिनांक ३०.१०.२०२१

# 'स्वामी सहजानंद भारतींच्या विचारांची समाजाला गरज'



नाऊर : येथील गोदावरी आश्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे. समवेत उपस्थित मान्यवर.


श्रीरामपूर : स्वामी सहजानंद भारती यांच्या विचारांची समाजाला गरज आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कार्उन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांच्या मार्गदर्शनाखाली रयत शिक्षण संस्थेच्या स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे व प्राध्यापकांनी नाऊर येथील गोदावरी आश्रमाला भेट दिली. याप्रसंगी डॉ. पोंधे बोलत होते. ते म्हणाले की, गोदावरीकाठी राहून महाराजांनी निस्वार्थ भावनेने समाजसेवा केली. राजकारणाचा संबंध समाजकारणाशी कसा असतो, हे प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी दाखवून दिले. आयुष्याच्या अखेरपर्यंत ते ऐहिक सुख, मोह यापासून दूर राहिले. मानसन्मान विनम्रपणे नाकारले. राजकारणातील मोठ्या पदाची जबाबदारी सांभाळत असतानाही त्यांनी धर्मग्रंथांचा अभ्यास व प्रबोधनकार्य चालू ठेवले होते. समाजासाठी स्वतःला वाहून घेतलेल्या अशा महान व्यक्तीच्या विचारांची समाजाला खऱ्या अर्थाने गरज आहे, असे डॉ. पोंधे म्हणाले.

प्रसंगी गोदावरी आश्रमचे संचालक पूज्य स्वामी चैतन्यानंद भारती यांनी महाविद्यालयाच्या उपक्रमांचे कौतुक केले. तसेच स्वामी सहजानंद भारती यांच्या विविध आठवणी सांगितल्या. आश्रमाची माहिती करून दिली. प्राचार्य व प्राध्यापकांनी आर्थिक स्वरूपातील मदत महाराजांकडे सुपूर्द केली. डॉ. रामदास नान्नर, डॉ. अनिल करवर, डॉ. शरद इंगवले, प्रा. विजय पाटोळे, डॉ. भागवत शिंदे, प्रा. चंद्रकांत भोये, ग्रंथपाल नारायण मेंगाळ आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

दै. लोकमत.
24.3.2021

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वत:च्या मुलाप्रमाणे शिकवावे- मीनाताई जगधने



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)-** शिक्षकांनी रयत हे एक संस्कारपीठ तथा विचारपीठ असून रयत ही स्वातंत्र्य, समता, स्वाभिमान या चार सूत्रांवर सुरू आहे. कर्मविरांच्या निष्ठा, श्रमप्रतिष्ठा, त्याग, स्वावलंबन, कमवा शिका योजना, विद्यार्थ्यांच्या मागे उभे राहणे अशा अनेक गोष्टी महत्त्वपूर्ण वाटतात. शिक्षकांनी सकारात्मक व्हावे. विद्यार्थ्यांना आपलेच मूल मानून शिकवावे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग काउन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांनी केले.

येथील स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या शिक्षक समृद्धी या दोन दिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. या कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे, डॉ. एल. डी. भोर, प्रा. डॉ. रामदास नान्नर, प्रा.डॉ. अनिल करवर, प्रा. डॉ. भागवत शिंदे यांनी साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले.

मीनाताई जगधने म्हणाल्या की, आदिवासी, गरीब, श्रमकरी मुलांच्या शिक्षणासाठी रयतेची कर्मविरांनी स्थापना केली. शिक्षण हे विकासाचे साधन आहे. शिक्षकांनी आपल्या अध्यापनाचा आशय आणि विषय हा विचार करायला लावणारा ठेवायला हवा.

प्राचार्य डॉ.एन.एस.गायकवाड म्हणाले, की कार्यपूर्तता करणे हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट असते. भविष्यवेधी विकासलक्षी कार्य पूर्तता करणारे प्रशासन हवे. नियोजन, व्यवस्थापन यांची पूर्तता प्रशासनात येते. प्रशासनात मानवी घटक महत्त्वाचे असतात आणि त्यांना भौतिक घटक हे मदत करत असतात.

संस्थेचे जनरल बॉडी सदस्य प्रकाश निकम पाटील म्हणाले, महाविद्यालय स्तरावरील शिक्षणशास्त्राचे प्रशिक्षण न झालेल्या शिक्षकांना खऱ्या प्रशिक्षणाची गरज असून, अशा कार्यशाळा व्हाव्यात. कर्मविरांनीच उत्तम शिक्षक निर्मितीसाठी शिक्षणशास्त्र विद्यालय व महाविद्यालयांची स्थापना केली होती, हे स्पष्ट केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय चर्चासत्राचे समन्वयक प्रा. विजय पाटोळे यांनी करून दिला. समारोपप्रसंगी प्रा. रीना जोशी,डॉ. मेघराज औटी, प्रा. किरण पोपेरे यांनी मनोगते व्यक्त केली. प्रा. एन. एच. मेंगाळ यांनी आभार मानले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. शरद इंगवले यांनी केले. प्रसंगी नामदेव चव्हाण, बाबासाहेब काळे, सूर्यकांत जगधने, पठाण आदी उपस्थित होते.

दै. सार्वमत

दि. ९.३.२०२१

# गुणवत्तापूर्ण शिक्षण हे स्त्री-पुरुष समानतेसाठीचे सूत्र - प्राचार्य डॉ. पोंधे

श्रीरामपूर (प्रतिनिधी)- स्त्री-पुरुष समानता वाढीस लागावी तसेच महिलांच्या समस्या कमी होण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण हा प्रभावी मार्ग असल्याचे प्रतिपादन येथील स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी केले.

महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. असे असले तरीही महिलांवरील अन्याय अत्याचाराच्या घटना देखील चिंता करायला लावणाऱ्या आहेत.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. चंद्रकांत भोये म्हणाले. स्त्रियांना सन्मान देण्यासाठी आजचा दिवस अतिशय महत्त्वाचा मानला गेला आहे. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक अशा सर्वच क्षेत्रांत स्त्रिया अग्रेसर आहेत. समाज सुधारण्यासाठी स्त्रिया सर्वात प्रभावी काम करू शकतात, असेही ते म्हणाले.

याप्रसंगी सोनाली थोरात, हिना पटेल, केतकी चालुक्य, जिजाबाई थोरात, आशा सिनारे, रोहिणी गावडे, अतुल गायकवाड, तृप्ती कोरडे, साक्षी भांवरे, सोनाली सोनवणे यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक प्रा.डॉ.अनिल करवर यांनी केले. ईशस्तवन, स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. माधुरी जेजूरकर हिने सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा गायकवाड आणि अविनाश जावळे यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. डॉ. रामदास नान्नर, डॉ. शरद इंगवले, प्रा. विजय पाटोळे, डॉ. भागवत शिंदे, प्रा.नारायण मेंगाळ, श्री नामदेव चव्हाण, कार्यालयीन सेवक उपस्थित होते.

। । जळगाव । नांदेड । अकोला येथून प्रसिद्ध

f SakalNews

सकाळ

• पुणे, ★ सोमवार, ३१ ऑगस्ट २०२०

ily. • आर.एन.आय.-१५५७/५७, रजि. नं. पी.सी.डब्ल्यू./०६९/२०१८-२०२०.

सकाळ » TODAY

पुणे, सोमवार, ३१ ऑगस्ट २०२०

03

## प्रा. अनिल करवर यांना पीएच.डी.



प्रा. अनिल करवर

श्रीरामपूर : रयत शिक्षण संस्थेच्या येथील स्वामी सहजानंद भारती महाविद्यालयातील प्रा. अनिल किसन करवर यांना सोलापूर येथील पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर विद्यापीठाने नुकतीच शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. प्रदान केली. प्रा. करवर यांनी 'आदिवासी व बिगर आदिवासी भागातील बहुवर्ग अध्यापन होत असलेल्या प्राथमिक शाळांचा तुलनात्मक अभ्यास' या विषयावर प्रबंध सादर केला. त्यांना प्रा. डॉ. व्ही. के. बामणे यांचे मार्गदर्शन लाभले.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

शुक्रवार, ९ ऑगस्ट २०१९



# बी. एड. अभ्यासक्रम समितीवर प्राचार्य मुकुंद पोंधे यांची निवड



श्रीरामपूर (प्रतिनिधी) - येथील रयत शिक्षण संस्थेच्या स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांची शासनाच्या एकात्मिक बी. एड. अभ्यासक्रम सुरु करण्यासाठीच्या समितीवर सदस्यपदी निवड झाली आहे. राज्यातील शासकीय व अशासकीय अनुदानित अध्यापक महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेच्या आदेशानुसार एकात्मिक बी. एड. अभ्यासक्रम सुरु करण्याचे सूचित केले आहे. या संदर्भात राज्यातील शासकीय व अशासकीय अनुदानित अध्यापक महाविद्यालयांमध्ये एनसीटीईच्या सुधारित निकषांनुसार एकात्मिक अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत शिफारस करण्यसाठी शासनाने संचालक, उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय समिती गठीत करण्यात आली. त्यामध्ये डॉ. पोंधे यांचा समावेश करण्यात आला आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
Shrirampur : rashtrasahyadri@gmail.com Ahmednagar : angrashtrasahyadri@gmail.com

● अहमदनगर ● पान नं. ८ ● मंगळवार, ७ जानेवारी २०२०

# ज्ञानाविना माणसाचा विकास अशक्य-न्या. मोहम्मद सलीम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :** ज्ञानाविना माणसाचा विकास होणे शक्य नाही. त्यासाठी शिक्षणाचे महत्त्व जाणून प्रत्येकाने सर्वांगाचे भरीव ज्ञान संपादन करावे, असे आवाहन श्रीरामपूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश मोहम्मद नासीर मोहम्मद सलीम यांनी केले.

रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय व स्वामी सहजानंद भारती अध्यापक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने वडाळा महादेव येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत श्रमसंस्कार शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणुन ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, जो देशाशी प्रामाणिक आहे, तो प्रत्येकजण भारतीय आहे, असे सांगून देशातील सद्यस्थितीतील वातावरणाबद्दल चिंता व्यक्त करून प्रत्येकाने आपल्यातील श्रमशीलता, शांतता व सौहार्दता जपण्याचे आवाहन त्यांनी केले.

दिवाणी न्यायाधीश डी. पी. कासट यांनी भारत ही संतभूमी असल्याचे सांगून अज्ञान हेच दुःखाचे मूळ कारण असल्याने अज्ञानाचा अंधकार घालवून ज्ञानी होण्याचा सल्ला दिला. रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन परिषद सदस्या श्रीमती मीनाताई जगधने यांनी अध्यक्षीय भाषणात ग्रामीण जीवनातील संघर्षाची चर्चा करून प्रतिकुलतेवर जो मात करतो तोच जीवनाची लढाई जिंकतो, असे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनावर भर देऊन स्वयंवेद यासारखे ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा सल्ला दिला.

यावेळी वाहतूक शाखेचे पो. कॉ. दादासाहेब गुंड यांनी विद्यार्थी व ग्रामस्थांना वाहतुकीचे महत्व समजावून सांगितले.प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे यांनी करून दिला. शिबिराचे उद्घाटन वडाळा महादेव येथील सरपंच मोहिनीताई जेधे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी न्या. बी. बी. तोष्णीवाल, न्या. एस. एम. बोमिडवार, डॉ. रविंद्र जगधने, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर आदी प्रमुख उपस्थित होते. तसेच उपसरपंच आंद्रेस राठोड, रोहिदास पवार, सौ. मीराबाई पवार, बाबासाहेब पवार, उत्तमराव पवार, सौ. सुलोचना पवार, गुलाबराव पवार, धनंजय पवार, रोहिदास उघडे, विजय राठोड, रामभाऊ कासार, प्रफुल्ल पवार, उद्धवराव पवार, प्रशांत दर्शने, बापूसाहेब गायकघाड आदीसह ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा, डॉ. सुनील खिलारी, प्रा. डॉ. गणेश लोखंडे, प्रा. सौ. उषा आढाव, प्रा. डॉ. भागवत शिंदे, प्रा. जलाल पटेल, प्रा. राजेंद्र गायधने,. प्रा. वैशाली वाघ यांनी परिश्रम घेतले. प्राचार्य डॉ. एम. एस. पोंदे यांनी शेवटी सर्वांचे आभार मानले.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
रविवार, २८ जुलै २०१९

# सहजानंद भारती बी.एड.चा १०० टक्के निकाल

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)** – येथील रयत शिक्षण संस्थेच्या स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचा बी. एड.चा निकाल १०० टक्के लागला आहे. योगीता पाचपिंड व करिश्मा पठाण यांनी ८०.५५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. तेजस्विनी शेळके हिने ८०.३५ टक्के गुण मिळवून द्वितीय तर मेघना गांडुळे हिने ७८.२५ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. ९ विद्यार्थी विशेष प्राविण्य, तर १३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. तसेच प्रथम वर्ष बी. एड.चा निकालही १०० टक्के लागला आहे. सीमा वडितके हिने प्रथम, जयश्री साळुंके हिने द्वितीय, तेजश्री जाधव हिने तृतीय क्रमांक पटकाविला आहे.


CMYK

सार्वमत
मंगळवार, २६ फेब्रुवारी २०१९

# 'सहजानंद' ला तृतीय पुरस्कार

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– येथील रयत शिक्षण संस्थेच्या स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या २०१७-१८ या वर्षाच्या डॉ. बी.एस. शिंदे यांच्या 'सहजानंद' या वार्षिक नियतकालिकास ,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा व्यावसायिक गटातून तृतीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. प्रशस्तीपत्रक व ५ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरुप असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.एस. पोंधे यांनी दिली. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# तरुणांनी व्यावसायिक शिक्षण आत्मसात करावे : जगधने



वडाळा महादेव येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना मीनाताई जगधने समवेत मान्यवर.

वडाळा महादेव (वार्ताहर)– विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शिक्षण घेत असताना केवळ नोकरी हेच ध्येय न ठेवता समाजोपयोगी उद्योग व्यवसायाकडे लक्ष द्यायला हवे, त्यासाठी पारंपारिक शिक्षणाबरोबर व्यावसायिक शिक्षणही आत्मसात करायला हवे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग काउन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेचे ग.ब. नारायणराव बोरावके कॉलेज, सी. डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, स्वामी सहजानंद बी.एड. कॉलेज आणि सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना समर्थ भारत अभियान, सक्षम युवा, समर्थ भारत यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष श्रम संस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुमन शहा होते. प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार सुभाष दळवी होते.

प्रास्ताविक बोरावके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.एच. शिंदे यांनी केले. प्राचार्य एल.डी. भोर व वडाळा गावचे माजी सरपंच सुनील कुदळे यांनी मनोगतातून शिबिरार्थी, विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी यांचे कौतुक केले.

कार्यक्रमास सरपंच उषाताई लांडे, उपसरपंच हनुमान राऊत, सोसायटीचे अध्यक्ष रोहिदास कासार, गुलाबराव पवार, माणिकराव पवार, धनंजय पवार, रामभाऊ कसार, प्रशांत दर्शने, सुलोचना पवार आदींसह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी तिनही महाविद्यालयांतील कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एस.बी. सय्यद, प्रा.एस.डी. पवार, प्रा. डॉ. डी.डी. शेंडे, प्रा. डॉ. सुनील खिलारी, प्रा. जलाल पटेल, प्रा. डॉ. बी.ए. शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सीमा चव्हाण यांनी केले.

**कर्मवीर जयंती** • कोल्हापूर जि. प. चे माजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी देशमुख यांचे प्रतिपादन

Page No. 2 दै. दिव्य मराठी २०/९/२०१९ शुक्रवार

# कर्मवीरांना लाखोंचा पोशिंदा घडवायचा होता...

प्रतिनिधी | श्रीरामपूर

कर्मवीर भाऊराव पाटलांपुढे मोठी आव्हाने असताना इच्छाशक्ती, चिकाटी व परिश्रमातून त्यांनी डोंगराएवढे काम केले. बहुजनांना शिक्षण देऊन केवळ लाखातला एक विद्यार्थी त्यांना घडवायचा नव्हता, तर लाखाचा पोशिंदा घडवायचा होता. त्यामुळे रुम्हणं आणि पेन याचे विलक्षण नाते जोडणारी, शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांचे गावकी व भावकीचे नाते तुटणार नाही, अशी शिक्षण व्यवस्था त्यांनी उभी केली, असे प्रतिपादन कोल्हापूर जिल्हा परिषदेचे माजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख यांनी बुधवारी केले.

येथील बोरावके महाविद्यालयात रयत शैक्षणिक संकुलाच्या वतीने आयोजित कर्मवीर जयंती समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. रयतच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीना जगधने अध्यक्षस्थानी होत्या. देशमुख यांनी कर्मवीरांच्या जीवनातील त्याग व योगाच्या आठवणी सांगत त्यांच्या कार्याचे महत्त्व विशद केले. आजच्या युवकांनी सुखाच्या दळभद्री संकल्पना बदलण्याचा शोध घेऊन आपला जन्म कशासाठी या प्रश्नाचे उत्तर शोधावे व आत्मविश्वासाने ध्येय गाठावे, असे ते म्हणाले.



कर्मवीर जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना इंद्रजित देशमुख. समवेत मीना जगधने, प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे, प्राचार्य डॉ. लक्ष्मण भोर, प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे, डॉ. रवींद्र जगधने आदी. छाया : सुनील पांढरे.

देशमुख यांचा त्याग, रयत शिक्षण संस्थेविषयीची निष्ठा व तळमळ विद्यार्थ्यांनी अनुसरावी, तसेच उत्तम विद्यार्थी व आदर्श नागरिक होण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन जगधने यांनी केले.

प्रा. मनीषा निफाडे व प्रा. डॉ. उज्ज्वला भोर यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाल्याबद्दल, तसेच प्राचार्य डॉ. शिंदे यांना निष्ठावान गुणी प्राचार्य पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. पीएचडी प्राप्त प्रा. बापूसाहेब घोडके यांचाही सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. बाळासाहेब गार्डी व प्रा. मनीषा निफाडे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे व अन्य पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

Page no. 15

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

बुधवार, १० जानेवारी २०१८

## जुनेद शेखची विद्यापीठ प्रतिनिधीपदी निवड



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)** – येथील रयत शिक्षण संस्था संचालित स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी. एड कॉलेज) च्या विद्यापीठ परिषदेच्या विद्यापीठ प्रतिनिधी पदावर सर्वानुमते शेख जुनेद मुख्तार याची निवड करण्यात आली. तर विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्षपदी वर्षा जगताप हिची निवड करण्यात आली. यावेळी विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. अनिल करवर, उज्ज्वला गाडेकर, तेजस्विनी शेळके, करिश्मा पठाण, दीपाली साळुंके, गावित, पुंडलिक यांच्यासह सर्व छात्राध्यापक, प्राध्यापक उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एम. एस. पोंधे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली.

यांना आभार मानले.

दै. पुढारी पान नं. ४

## जुनेद शेख विद्यापीठ प्रतिनिधी



**श्रीरामपूर :** येथील रयत शिक्षण संस्था संचलित स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी. एड. कॉलेज) च्या विद्यापीठ परिषदेच्या विद्यापीठ प्रतिनिधी पदावर सर्वानुमते शेख जुनेद मुखतार याची निवड करण्यात आली. तर विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्षपदी वर्षा जगताप हिची निवड करण्यात आली. यावेळी विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. अनिल करवर, उज्ज्वला गाडेकर, तेजस्विनी शेळके, करिश्मा पठाण, दिपाली साळुंके, गावित, पुंडलीक उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एम. एस. पोंधे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. जुनेद शेख याच्या निवडीबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

दैनिक सार्वमत
दि. ६।८।२०१५
Page No. 2

# प्रा. भागवत शिंदे यांना पीएचडी प्रदान



श्रीरामपूर (प्रतिनिधी) - येथील रयत शिक्षण संस्थेच्या स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राध्यापक भागवत आसाराम शिंदे यांना कोल्हापूर विद्यापीठाने शिक्षणशास्त्र विद्या शाखेतून छात्राध्यापकांसाठी शिक्षक उत्तरदायित्व संवर्धन कार्यक्रमाचे विकसन व त्याचा अध्यापन अभियोग्यतांशी संबंध-एक अभ्यास या शोध प्रबंधासाठी पीएचडी पदवी प्रदान केली. त्यांना प्रा. डॉ. नीलिमा सप्रे यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक सकाळ
शनिवार दि. ८/०७/२०१७.

# 'सहजानंद'चा निकाल ९६ टक्के

श्रीरामपूर, ता. ७ : स्वामी सहजानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा बी. एड.चा निकाल ९५.९५ टक्के लागला. विद्या लोखंडे ७९.६ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात पहिली आली, अशी माहिती प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी दिली. कुणाल कोलते (गुण ७९.१) याने दुसरा व दीप्ती कराळे (गुण ७८.९५) हिने तिसरा क्रमांक मिळविला. विशेष प्रावीण्यासह २० विद्यार्थी, पहिल्या श्रेणीत १९ व चार विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. पहिल्या वर्षाचा निकाल १०० टक्के लागला. त्यात योगिता तरटे पहिली आली.

पुढारी पेपर , बुधवार, दि. २८ सप्टेंबर २०१६



# प्रा. डॉ. मुकुंद पोंधे यांची बी.एड्. प्राचार्यपदी नियुक्ती

श्रीरामपूर (प्रतिनिधी) - येथील रयत शिक्षण संस्थेच्या सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रा.डॉ. मुकुंद पोंधे यांची अधिकृत निवड झाली आहे.



प्रा.डॉ. मुकुंद पोंधे हे २००० सालापासून रयत शिक्षण संस्थेमध्ये कार्यरत आहेत. या आधी त्यांनी संस्थेच्या बळवंत कॉलेज, विटा आणि एस.जी.एम. कॉलेज, कराड येथील महाविद्यालयामध्ये शिक्षशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून काम केले आहे. १६ जानेवारी २०१४ पासून याच महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य म्हणून प्रा.पोंधे यांनी जबाबदारी सांभाळली. १६ सप्टेंबर २०१६ पासून संस्थेने विद्यापीठाच्या निवड समितीमार्फत अधिकृतरित्या त्यांची प्राचार्यपदी नियुक्ती केली आहे. त्यांनी सत्तरहून अधिक आंतराष्ट्रीय, राष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग घेतला असून शिक्षणशास्त्राच्या १४ पुस्तकांचे ते सहलेखक आहेत तर चार पुस्तकांचे त्यांनी संपादनही केले आहे. शिक्षणशास्त्र विषयातील विविध लघुसंशोधनेही त्यांनी पूर्ण केली आहेत. आंतराष्ट्रीय-राष्ट्रीय जर्नल्समध्ये त्यांचे तीसहून अधिक संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत. शिक्षणातील माहिती तंत्रज्ञानावर त्यांच्या लेखास नाशिक येथील इन्साईट संशोधन संस्थेद्वारे 'बेस्ट आर्टिकल अॅवार्ड' देऊन गौरविण्यात आले आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक व महाराष्ट्र राज्य शिक्षक प्रशिक्षक परिषदेच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय 'डॉ. रविंद्र दवे प्रेरणा पुरस्कार' ही त्यांना मिळालेला आहे.

लोकमत
हॅलो अहमदनगर

अहमदनगर, शनिवार, दि. १० सप्टेंबर २०१६ २

## 'सहजानंद'ला पुरस्कार

श्रीरामपूर : रयत शिक्षण संस्थेच्या येथील स्वामी सहजानंद भारती महाविद्यालयच्या २०१४-१५ मध्ये प्रकाशित झालेल्या 'सहजानंद' या नियतकालिकास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा तृतीय क्रमांक मिळाला. अहमदनगर विभागस्तरावर पाच हजार रुपयांचा पुरस्कार मिळाल्याची माहिती प्राचार्य डॉ. एम. एस. पोंधे यांनी दिली.

## भोसले सेवानिवृत्त

श्रीरामपूर : स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनचे लिपीक मधुकर भोसले हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बापूसाहेब पटारे यांच्या हस्ते भोसले यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. एम. एस. पोंधे, प्रकाश निकम पाटील, सुदाम औताडे आदी यावेळी उपस्थित होते.

7/12/2015

अहमदनगर | मुख्य अंक | अहमदनगर टुडे

दैनिक सकाळ (अ.नगर टुडे) Page No 4

## श्रीरामपूर तालुका वृत्त

# स्वामी सहजानंद महाविद्यालयाचा बी.एड.चा निकाल ९५ टक्के



नयना पगारे

रयत शिक्षण संस्थेच्या स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा बी.एड. परीक्षेचा निकाल ९४.८७ टक्के लागला. नयना पगारे यांनी ८४.३३ टक्के गुण मिळवून पहिला क्रमांक मिळविला. दीपाली क्षीरसागर यांनी दुसरा व वैजयंती कुळधरण यांनी तिसरा क्रमांक मिळविला. महाविद्यालयाचे पाच विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने, प्रभारी प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

सकाळ

शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०१५

# विद्यार्थ्यांना काळाप्रमाणे ज्ञानकौशल्य द्यावे : डॉ. सोनवणे

श्रीरामपूर, ता. २६ : "विद्यार्थ्यांच्या मोठेपणातच शिक्षकांचे मोठेपण असते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बदलत्या काळाप्रमाणे विविध कौशल्यांसाठी प्रेरणा द्यावी," असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य व शिक्षणशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे यांनी केले.

येथील स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र (बीएड) महाविद्यालयात बीसीयुडी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'शिक्षणातील नैतिकता' या विषयावर आयोजित केलेल्या एक दिवसीय चर्चासत्रात ते बोलत होते. प्रभारी प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे, माजी प्राचार्य डॉ. शंकर गागरे, ॲड. भागचंद चुडीवाल, बापूसाहेब पटारे, प्रा. डॉ. बाळासाहेब मुरादे या वेळी उपस्थित होते. प्राचार्य पोंधे यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. या वेळी चंद्रशेखर हासे, संदीप कोते यांनी मनोगत व्यक्त केले. मधुकर भोसले यांनी स्वागत केले.

प्रा. अनिल करवर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विजय पाटोळे यांनी अहवालवाचन केले. उपप्राचार्य प्रा. एस. जी. पुंड, प्रा. एस. पी. हिरगळ, प्रा. डॉ. आर. के. नाम्रर, प्रा. नारायण मेंगाळ, प्रा. चंद्रकांत भोये, दत्तात्रेय ढमढेरे उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

। अंक २४९ वा । वर्ष ३९ वे । सोमवार, दि. २९ सप्टेंबर २०१४ । पाने १४

Daily Sarvamat Dated 29/9/14

## शिक्षणाला तंत्रज्ञानाची जोड हवी : निकम

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)** – शिक्षण क्षेत्राला तंत्रज्ञानाची जोड हवी तरच शिक्षण गतिशील बनेल असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य प्रकाश निकम यांनी केले.

येथील स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या माहिती तंत्रज्ञान व ई-एज्युकेशन विकास या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्रात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एम.एस.पोंधे होते.

ते म्हणाले की, आजचे शिक्षण बहुआयामी होण्यासाठी तंत्रज्ञान व अध्यापनासाठी विद्यार्थ्यांना परिणामकारक व उपयुक्त अध्ययनासाठी तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे. ज्ञान ही एक महाशक्ती असून ते मिळविण्यासाठी प्रयत्न, जिद्द, चिकाटी, वैज्ञानिक दृष्टीकोन यांच्याबरोबरच तंत्रज्ञान प्रगतीमधील शोध, संशोधनाची अत्यंत आवश्यकता आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेसाठी केडगाव येथील विद्याप्रतिष्ठान बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र चोभे, प्रा. डॉ. दीपक चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विविध जिल्ह्यातील विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक यावेळी उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रस्ताविक समन्वयक प्रा. अनिल करवर यांनी केले. कार्यक्रमासाठी विलास कोतकर, प्रा. सौ. सुशीला हिरगळ, प्रा. डॉ. रामदास नान्नर, प्रा. विजय पाटोळे, प्रा. चंद्रकांत भोये, प्रा. नारायण मेंगाळ, दत्तात्रय ढमढेरे यांच्यासह सेवक, विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

सकाळ

दि - 29/3/2012

# शिक्षणातून शेतीनिष्ठा जोपासावी : अॅड. शिंदे

**श्रीरामपूर, ता. २८ :** आजचे तरुण शिक्षणानंतर नोकरीच्या शोधात दिसतात. शेती करण्यास कोणीही तयार नाही. शिक्षणातून शेतीनिष्ठा जोपासली जावी, अशी अपेक्षा रयत शिक्षणसंस्थेचे कार्याध्यक्ष अॅड. रावसाहेब शिंदे यांनी व्यक्त केली.

स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून शिंदे बोलत होते. प्राचार्य डॉ. ज्ञानदेव म्हस्के, प्राचार्य डॉ. संजय कांबळे, माजी प्राचार्य शंकरराव अनारसे आदी या वेळी उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, "कर्मवीरांच्या कमवा व शिका योजनेतून, स्वतःच्या कुटुंबाच्या त्यागातून ग्रामीण तरुण उभा राहिला. कृतीबरोबर मनोवृत्ती उत्तम करण्याचा प्रयत्न केला; परंतु आजच्या शिक्षणातून जंगली, रानटी माणसे निर्माण होतील की काय असे वाटते. अपवाद वगळता आजचे शिक्षण निरुपयोगी वाटते. आजचे शिक्षक वाचन करीत नाहीत. ज्ञानदानास आपण पात्र आहोत का, हे शिक्षकांनी तपासावे."

वाचन-लेखन या उत्तम सवयी असून, त्यामुळे मनुष्य बहुश्रुत होतो. काळाच्या बदलांना सामोरे जातात तेच यशस्वी होतात. विद्यार्थी-शिक्षकांना



**श्रीरामपूर : सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात अॅड. रावसाहेब शिंदे यांचे भाषण झाले.**

वाचनाचे साहित्य उपलब्ध व्हावे, यासाठी रयत शिक्षणसंस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक विद्यालयापर्यंत संगणक, इंटरनेट उपलब्ध करून दिले आहे, असे शिंदे म्हणाले.

प्राचार्य डॉ. शंकरराव गागरे यांनी प्रास्ताविक व उपप्राचार्य एस. जी. पुंड यांनी स्वागत केले. पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. कार्याध्यक्ष प्रा. विजय पाटोळे यांनी अहवालवाचन केले. प्रा. आनंद शिंदे व संतोष चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अनिल करवर यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा. डॉ. मुकुंद पोंधे, प्रा. एस. पी. हिरगळ, प्रा. आर. के. नान्नर, अधीक्षक विश्वनाथ गाढे, विद्यापीठ प्रतिनिधी पूनम धनवटे, प्रा. डॉ. बाबूराव उपाध्ये, सुदाम औताडे, सुकदेव सुकळे आदी उपस्थित होते.

100% मनी बँक

Sakal 28/3/12 - Page-2


# शिक्षणातून शेतीनिष्ठा जोपासावी : अॅड. शिंदे

**श्रीरामपूर, ता. २८ :** आजचे तरुण शिक्षणानंतर नोकरीच्या शोधात दिसतात. शेती करण्यास कोणीही तयार नाही. शिक्षणातून शेतीनिष्ठा जोपासली जावी, अशी अपेक्षा रयत शिक्षणसंस्थेचे कार्याध्यक्ष अॅड. रावसाहेब शिंदे यांनी व्यक्त केली.

स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून शिंदे बोलत होते. प्राचार्य डॉ. ज्ञानदेव म्हस्के, प्राचार्य डॉ. संजय कांबळे, माजी प्राचार्य शंकरराव अनारसे आदी या वेळी उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, "कर्मवीरांच्या कमवा व शिका योजनेतून, स्वतःच्या कुटुंबाच्या त्यागातून ग्रामीण तरुण उभा राहिला. कृतीबरोबर मनोवृत्ती उत्तम करण्याचा प्रयत्न केला; परंतु आजच्या शिक्षणातून जंगली, रानटी माणसे निर्माण होतील की काय असे वाटते. अपवाद वगळता आजचे शिक्षण निरुपयोगी वाटते. आजचे शिक्षक वाचन करीत नाहीत. ज्ञानदानास आपण पात्र आहोत का, हे शिक्षकांनी तपासावे."

वाचन-लेखन या उत्तम सवयी असून, त्यामुळे मनुष्य बहुश्रुत होतो. काळाच्या बदलांना सामोरे जातात तेच यशस्वी होतात. विद्यार्थी-शिक्षकांना





**श्रीरामपूर : सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात अॅड. रावसाहेब शिंदे यांचे भाषण झाले.**

वाचनाचे साहित्य उपलब्ध व्हावे, यासाठी रयत शिक्षणसंस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक विद्यालयापर्यंत संगणक, इंटरनेट उपलब्ध करून दिले आहे, असे शिंदे म्हणाले.

प्राचार्य डॉ. शंकरराव गागरे यांनी प्रास्ताविक व उपप्राचार्य एस. जी. पुंड यांनी स्वागत केले. पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. कार्याध्यक्ष प्रा. विजय पाटोळे यांनी अहवालवाचन केले. प्रा. आनंद शिंदे व संतोष चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अनिल करवर यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा. डॉ. मुकुंद पोंधे, प्रा. एस. पी. हिरगळ, प्रा. आर. के. नान्नर, अधीक्षक विश्वनाथ गाढे, विद्यापीठ प्रतिनिधी पूनम धनवटे, प्रा. डॉ. बाबूराव उपाध्ये, सुदाम औताडे, सुकदेव सुकळे आदी उपस्थित होते.

100% मनी बँक

नवी आशा नवी दिशा
# सार्वमत
रविवार दि. ९ मे २०१० ८

## बी.एड. महाविद्यालयास पुरस्कार

श्रीरामपूर( प्रतिनिधी )- रयत शिक्षण संस्थेने सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून सुरू केलेल्या पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श महाविद्यालय पुरस्कारासाठी येथील स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन महाविद्यालयाची निवड झाली. या निवडीबद्दल रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.शंकरराव गागरे, यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

महाविद्यालयाची शैक्षणिक गु[illegible]ा, संशोधनातील विविध काम, सामाजिक व क्रीडाक्षेत्रातील शिक्षणं, मुलभूत सुविधा अद्यावत दृकश्राव्य शिक्षण, संपन्न ग्रंथालय, विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठीचे प्रयत्न, महाविद्यालयाप्रती माजी विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रीया, आणि नोकरीतील सहभाग आदींची दखल घेऊन संस्थेच्या ४० महाविद्यालयातून या महाविद्यालयाची पहिल्यांदाच निवड झाली आहे. या पुरस्कारचे वितरण आज ९ मे रोजी सातारा येथे केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार आणि अध्यक्ष रावसाहेब शिंदे यांच्या हस्ते देण्यात येणार आहे.



*श्रीरामपूर येथील स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन महाविद्यालयाची आदर्श महाविद्यालय पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.शंकरराव गागरे यांचा सत्कार करण्यांत आला.*

हार्दिक अभिनंदन

**मातृ देवो भव...**

ईश्वराचेच दुसरे रूप म्हणजे आई; मग ती ऐलतीरीच्या देशातील असो की पैलतीरीच्या; तिचे 'आई'पण इथून-तिथून ...असते. दोन्ही तीरांना समृद्ध करीत आई नावाची नदी वाहतच असते...जिवात जीव असेपर्यंत. तीच माया- ...त्सल्य वसत असते प्रत्येक मातृहृदयात. आजच्या जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून आम्हालाही नेमके हेच ...साठीच प्रत्येक आईविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी ही विशेष पुरवणी!